दैनिक

# चकमक

संपादक : शामसुंदर चितोडा          कार्यकारी संपादक : कैलास फुलारी




वर्ष : ०१ ले ✻ अंक : ३६ ✻ जालना ✻ ✻ रविवार ०६ सप्टेंबर २०२६ ✻ ✻ पाने : ४ ✻ ✻किंमत : २ रूपये ✻

## पावसाअभावी सोयाबीन पिकांचे मोठे नुकसान; आ.बबनराव लोणीकरांकडून वाटूर येथे पाहणी



### तातडीने नुकसान भरपाई, पीक विमा व अनुदान देण्याची मागणी; पंचनामे करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांना पत्र

वाटूर, ता. परतूर : पावसाने ओढ दिल्याने परतूर-मंठा विधानसभा मतदारसंघातील खरीप पिकांना मोठा फटका बसला असून सोयाबीनसह कापूस, मूग, उडीद व तूर पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर माजी मंत्री तथा आमदार बबनराव लोणीकर यांनी वाटूर येथे शेतकऱ्यांच्या शेतात जाऊन नुकसानीची प्रत्यक्ष पाहणी केली. वाटूर येथील शेतकरी शुभम आडे यांच्या शेतातील सोयाबीन पिकाची पाहणी करताना पावसाअभावी पिकाची झालेली दयनीय अवस्था आमदार लोणीकर यांनी प्रत्यक्ष पाहिली. पिकाने माना टाकल्या असून अनेक ठिकाणी सोयाबीनचे पीक करपून गेले आहे. गेल्या २५ ते ३० वर्षांच्या कालावधीत एवढी गंभीर पावसाची परिस्थिती पाहायला मिळाली नसल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. यंदा कमी पावसातच शेतकऱ्यांनी मोठ्या अपेक्षेने पेरण्या केल्या. मात्र महागडी खते, बियाणे व औषधांवर खर्च करूनही पावसाअभावी पिके हातची गेल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला आहे. अनेक शेतकऱ्यांनी बँका तसेच सावकारांकडून कर्ज घेऊन शेतीची पेरणी केली आहे. सध्या पिकांना पुरेसा पाऊस न मिळाल्याने फुलोरा व शेंगधारणा प्रभावित झाली असून शेंगा गळून पडत आहेत. काही महसूल मंडळांमध्ये अत्यल्प पावसाची नोंद झाली असून काही ठिकाणी केवळ ६, १४ तर काही ठिकाणी जास्तीत जास्त २० मिमीपर्यंत पाऊस झाल्याचे आमदार लोणीकर यांनी सांगितले. त्यामुळे मंठा, परतूरसह संपूर्ण जालना जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या खरीप पिकांचे मोठे नुकसान झाले असल्याचे त्यांनी नमूद केले.

**तातडीने पंचनामे करण्याची मागणी**

शेतकऱ्यांच्या नुकसानीचे पंचनामे तातडीने करण्यात यावेत, यासाठी आमदार बबनराव लोणीकर यांनी जिल्हाधिकाऱ्यांना पत्र दिले आहे. वरिष्ठ आदेशाची प्रतीक्षा न करता स्थानिक पातळीवर **(पान ३ वर)**

## हैदराबाद गॅझेटमधील नोंदींवरून पात्र मराठ्यांना कुणबी प्रमाणपत्र द्या; मात्र कुणबी समाजावर अन्याय नको

### डॉ. संजय लाखे-पाटील यांची मागणी; मराठा-कुणबी समाजात संघर्ष निर्माण होणार नाही यासाठी शासनाने स्पष्ट, पारदर्शक व कायदेशीर भूमिका घ्यावी

जालना । प्रतिनिधी : हैदराबाद गॅझेटमधील अधिकृत नोंदींच्या आधारे ज्या मराठा समाजातील व्यक्तींची कुणबी म्हणून नोंद अथवा वंशावळ सिद्ध होते, अशा पात्र व्यक्तींना कुणबी प्रमाणपत्राचा लाभ मिळावा. मात्र, कोणत्याही अपात्र व्यक्तीला सरसकट प्रमाणपत्र देऊन विद्यमान कुणबी समाजाच्या आरक्षण हक्कांवर परिणाम होणार नाही, याची शासनाने दक्षता घ्यावी. या संपूर्ण प्रक्रियेत मराठा आणि कुणबी समाजात अनावश्यक संघर्ष निर्माण होऊ नये, यासाठी शासनाने स्पष्ट, पारदर्शक आणि कायदेशीर भूमिका जाहीर करावी, अशी मागणी मराठा क्रांती मोर्चाचे समन्वयक डॉ. संजय लाखे-पाटील यांनी केली. जालना येथे पत्रकार परिषदेत बोलताना डॉ. लाखे-पाटील यांनी हैदराबाद गॅझेट, जात प्रमाणपत्र प्रक्रिया तसेच मराठा आरक्षणाच्या विविध मुद्द्यांवर भूमिका मांडली. हैदराबाद संस्थानाच्या काळातील महसुली नोंदी, शैक्षणिक दस्तऐवज, सनदी, कारनामे तसेच इतर अधिकृत नोंदींमध्ये ज्या व्यक्तींच्या पूर्वजांची कुणबी म्हणून नोंद आढळते, त्यांना नियम व कायद्याच्या चौकटीत प्रमाणपत्र मिळण्याचा मार्ग सुलभ केला पाहिजे, असे त्यांनी सांगितले.



**पात्रता, पुरावे आणि वंशावळीच्या आधारेच प्रमाणपत्र**

मराठा समाजातील प्रत्येक व्यक्ती कुणबी आहे, असा दावा करता येणार नाही. उपलब्ध पुरावे, जुन्या नोंदी आणि वंशावळीच्या आधारेच पात्रता निश्चित व्हावी. प्रमाणपत्र देण्याची प्रक्रिया सरसकट न ठेवता पुराव्यांच्या पडताळणीनंतरच निर्णय घेतला जावा. त्यासाठी प्रशासनाने आवश्यक कागदपत्रांची स्पष्ट यादी, पडताळणीची कार्यपद्धती आणि अर्जदारांसाठी मार्गदर्शक सूचना जाहीर कराव्यात, अशी मागणी त्यांनी केली.

हैदराबाद गॅझेटच्या संदर्भातील संभ्रम दूर करण्यासाठी पात्रता, पुरावे व वंशावळीच्या आधारे प्रमाणपत्र देण्याची संपूर्ण प्रक्रिया शासनाने स्पष्ट करणे आवश्यक आहे. अन्यथा या संवेदनशील विषयावर सामाजिक व राजकीय वातावरण तापण्याची शक्यता असल्याचेही त्यांनी नमूद केले.

**कुणबी समाजाच्या आरक्षण हक्कांचे संरक्षण व्हावे**

कुणबी समाजातील विद्यमान आरक्षण हक्कांना कोणताही धक्का लागू नये, याची काळजी शासनाने घेतली पाहिजे. पात्र मराठा व्यक्तींना त्यांच्या उपलब्ध पुराव्यांच्या आधारे न्याय मिळावा आणि त्याचवेळी कुणबी समाजाच्या घटनात्मक अधिकारांचे संरक्षण व्हावे, अशी संतुलित भूमिका शासनाने स्वीकारावी, असे डॉ. लाखे-पाटील म्हणाले. जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र देताना संविधान, संबंधित कायदे, शासन निर्णय आणि न्यायालयांनी निश्चित केलेली प्रक्रिया काटेकोरपणे पाळली पाहिजे. कायदेशीर प्रक्रियेबाहेर जाऊन घेतलेले निर्णय भविष्यात न्यायालयीन आव्हानास सामोरे जाऊ शकतात, असा दावाही त्यांनी केला.

**'हैदराबाद गॅझेटचा संभ्रम दूर करा'**

हैदराबाद गॅझेटच्या अंमलबजावणीबाबत निर्माण झालेला संभ्रम दूर करून शासनाने सर्व बाबी स्पष्ट कराव्यात. पात्र व्यक्तींना प्रमाणपत्र मिळण्यासाठी अनावश्यक अडथळे येऊ नयेत, तसेच अपात्र व्यक्तींना प्रमाणपत्र मिळू नये, यासाठी सक्षम पडताळणी यंत्रणा उभी करावी, अशी मागणी डॉ. लाखे-पाटील यांनी केली. दरम्यान, मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावर घेतलेल्या निर्णयांबाबत त्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या भूमिकेचे कौतुक केले. मराठवाड्यातील अनेक पात्र नागरिकांसाठी जात प्रमाणपत्र मिळण्याचा मार्ग खुला झाल्याचा दावा त्यांनी केला. मराठा समाजातील पात्र व्यक्तींना त्यांच्या पुराव्यांच्या आधारे न्याय मिळावा, कुणबी समाजाच्या घटनात्मक अधिकारांचे संरक्षण व्हावे आणि दोन्ही समाजांमध्ये अनावश्यक संघर्ष निर्माण होऊ नये, हीच आमची भूमिका आहे, असे डॉ. संजय लाखे-पाटील यांनी स्पष्ट केले.

## 'तुमसे ना हो पयेगा' ; ४७ हजार कोटींच्या घोषणेचा हिशेब द्या...!

### मराठवाड्याच्या विकासाच्या अनुशेषावर शिवसेनेचे उद्या जालन्यात लक्षवेधी आंदोलन:जिल्हाप्रमुख मनिष श्रीवास्तव

जालना/प्रतिनिधी : मराठवाड्याच्या विकासासाठी २०१६ मध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ४७ हजार कोटी रुपयांच्या विविध विकासकामांची घोषणा केली होती. मात्र, या घोषणेच्या तुलनेत प्रत्यक्षात तीन हजार कोटी रुपयांचीही विकासकामे झाली नसल्याचा आरोप शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे जिल्हाप्रमुख मनीष श्रीवास्तव यांनी केला. मराठवाड्याच्या विकासाचा अनुशेष आणि सरकारच्या घोषणांचा जाब विचारण्यासाठी 'तुमसे ना हो पयेगा' या उपरोधिक घोषवाक्याखाली शिवसेनेच्या वतीने आंदोलन करण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी पत्रकार परिषदेत दिली. रविवार, ६ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता गांधी चमन येथे हे



लक्षवेधी आंदोलन होणार असून, माजी विधान परिषद विरोधी पक्षनेते आमदार अंबादास दानवे आंदोलनास उपस्थित राहणार आहेत. या आंदोलनाची सुरुवात जालना येथून होत असून, १७ सप्टेंबर रोजी मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या दिवशी छत्रपती संभाजीनगर येथील विभागीय आयुक्त कार्यालयासमोर पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली आंदोलनाची सांगता करण्यात येणार असल्याचे श्रीवास्तव यांनी सांगितले. २०१६ मध्ये मंत्री मंडळाची विशेष बैठक संभाजीनगर येथे

## श्री गणेश विसर्जन मार्गाची प्रत्यक्ष पाहणी

जालना/प्रतिनिधी : आगामी श्री गणेश विसर्जनाच्या पार्श्वभूमीवर विसर्जन मार्गाची महापालिका,महावितरण, पोलिस यांनी संयुक्तरित्या प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी विसर्जन मिरवणुकीदरम्यान नागरिकांना कोणत्याही प्रकारचा त्रास होऊ नये आणि



विसर्जन मार्गात कोणताही अडथळा निर्माण होऊ नये, यासाठी विविध विभागांच्या कामांचा आढावा घेण्यात आला. यामध्ये स्वच्छता व्यवस्था, लाईट व्यवस्था, लोंबकळणाऱ्या विद्युत तारा, उघड्या डीपी, **(पान ३ वर)**

## जालन्यात आज सकल मराठा समाज संवाद मेळावा

### आ.कुटे, आ.खोतकर, आ. कुचे, आ. उढाण यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांचा सत्कार; पत्रकार-संपादकांचाही होणार गुणगौरव

जालना (प्रतिनिधी) : छत्रपती व्ही. के. फाउंडेशन आणि छावा महाराष्ट्र सेना, जालना यांच्या संयुक्त विद्यमाने सकल मराठा समाज संवाद मेळावा तसेच विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा सत्कार व गुणगौरव सोहळा आयोजित करण्यात आला आहे. रविवार, दि. ६ सप्टेंबर २०२६ रोजी दुपारी १ वाजता भाग्यनगर येथील मराठा सेवा संघ कार्यालयात हा कार्यक्रम होणार आहे. शेतकरी, नागरिक तसेच समाजाच्या मूलभूत प्रश्नांना विधानसभेत प्रभावीपणे वाचा फोडून न्याय मिळवून देण्यासाठी कार्य करणारे जलसम्राट आ. डॉ. संजय कुटे, आ. अर्जुनराव खोतकर, आ. नारायण कुचे आणि आ.



हिकमत उढाण यांचा यावेळी विशेष सत्कार करण्यात येणार आहे. तसेच सामाजिक, शैक्षणिक, राजकीय आणि पत्रकारिता क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या व्यक्तींचाही गौरव करण्यात येणार आहे. कार्यक्रमास माजी मंत्री तथा भारतीय जनता पक्षाचे प्रदेश सरचिटणीस डॉ. संजय कुटे, माजी मंत्री तथा अंदाज समिती प्रमुख आ. अर्जुनराव खोतकर, घनसावंगीचे आ. हिकमत उढाण, भारतीय जनता पक्षाचे जिल्हाध्यक्ष आ. नारायण कुचे तसेच पक्षाचे प्रवक्ते विनोद वाघ हे विशेष **(पान ३ वर)**

## जालन्याच्या विकासासाठी उद्या शिवसेनेचे जनआंदोलन; अंबादास दानवे यांच्या नेतृत्वात मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे जिल्हाप्रमुख महेश नळगे यांचे आवाहन

जालना : मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनाच्या पार्श्वभूमीवर जालन्याचा विकास तुमसे ना हो पायेगाङ्ग असा नारा देत शिवसेनेच्या वतीने सरकारविरोधात उद्या, रविवार दि. ६ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ११ वाजता गांधी चमन, जालना येथे जनआंदोलन आयोजित करण्यात आले आहे. हे जनआंदोलन शिवसेना नेते तथा विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दादा दानवे यांच्या नेतृत्वात होणार आहे. जालना जिल्ह्याच्या विकासाशी संबंधित विविध प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी या आंदोलनाचे आयोजन करण्यात आले आहे. या जनआंदोलनाला शिवसैनिक, पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच जालना जिल्ह्यातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून आंदोलनाला बळ द्यावे, असे जाहीर आवाहन शिवसेना जिल्हाप्रमुख महेश नळगे यांनी केले आहे.



जालन्याच्या हक्काच्या विकासासाठी आपला आवाज बुलंद करण्याची ही वेळ आहे. प्रत्येक शिवसैनिक आणि विकासाची अपेक्षा असलेल्या नागरिकाने उद्याच्या जनआंदोलनात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे,असे आवाहन जिल्हाप्रमुख महेश नळगे यांनी केले आहे.

## जालना मनपात तब्बल तेरा वर्षांनी शिक्षक दिन उत्साहात



जालना (प्रतिनिधी) : जालना महानगरपालिकेत तब्बल तेरा वर्षांनंतर शिक्षक दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त शनिवारी (दि. ५ सप्टेंबर) दुपारी चार वाजता अटल बिहारी वाजपेयी सभागृहात आयोजित कार्यक्रमात महानगरपालिकेच्या शाळांमधील शिक्षक, शिक्षिका व मुख्याध्यापकांचा शाल व ट्रॉफी देऊन सन्मान करण्यात आला. शिक्षण-विद्युत सभापती सौ. भाग्यश्री जोगस यांच्या पुढाकारातून हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. कार्यक्रमात शिक्षकांनी शाळांमध्ये सुरू असलेल्या विविध शैक्षणिक व प्रशासकीय उपक्रमांची माहिती दिली. तसेच काही शिक्षकांनी मनोगत व्यक्त करत महानगरपालिकेत तेरा वर्षांनंतर अशा उत्साहपूर्ण पद्धतीने शिक्षक दिन साजरा होत असल्याबद्दल समाधान व्यक्त केले. शिक्षकांनी सभापती भाग्यश्री जोगस यांचे आभार मानले. यावेळी बोलताना भाग्यश्री जोगस म्हणाल्या की, शिक्षकांबद्दलचा आदर, कृतज्ञता आणि आभार व्यक्त करण्याचा हा दिवस आहे. विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत शिक्षकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असून त्यांच्या कार्याचा गौरव करणे ही समाजाची जबाबदारी आहे. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे तथा सभागृह नेते आणि गटनेते महेशराव निकम यांनी शिक्षकांना मार्गदर्शन केले. शिक्षकांच्या कोणत्याही अडीअडचणीच्या काळात **(पान ३ वर)**

## सार्वजनिक गणेशोत्सवासाठी पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक; नियमांचे उल्लंघन केल्यास कायदेशीर कारवाई ; महानगरपालिका आयुक्त अंजली शर्मा (भा.प्र.से.) यांचे आवाहन

जालना: आगामी गणेशोत्सव पर्यावरणपूरक, स्वच्छ, सुरक्षित आणि शांततामय वातावरणात साजरा व्हावा यासाठी जालना शहर महानगरपालिकेने मार्गदर्शक सूचना जाहीर केल्या आहेत. शहरातील सर्व सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे, संस्था व नागरिकांनी सार्वजनिक ठिकाणी मूर्ती स्थापना, मंडप अथवा कमान उभारण्यापूर्वी महानगरपालिका, पोलीस प्रशासन, वाहतूक शाखा, अग्निशमन विभाग आणि महावितरण यांची पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक आहे, असे निर्देश महानगरपालिका आयुक्त अंजली शर्मा (भा.प्र.से.) यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिले आहेत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ आणि प्रदूषण नियंत्रण नियमांनुसार सर्व मंडळांनी पुढील बाबींचे काटेकोर पालन करणे आवश्यक आहे: परवानग्या व देखावे: सर्व परवानग्यांच्या प्रती मंडपाच्या दर्शनी भागात लावणे बंधनकारक असून, मंजूर आराखड्यानुसारच मंडप उभारण्यात यावा. वाहतुकीस, पादचाऱ्यांना तसेच रुग्णवाहिका व अग्निशामक दलास कोणताही अडथळा निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. पर्यावरणपूरक उत्सव: श्रीगणेश मूर्ती पर्यावरणपूरक,



नैसर्गिक रंगांची आणि मर्यादित उंचीची असावी. प्लास्टिक व थर्माकोलच्या वापरावर पूर्ण बंदी असून निर्माल्यासाठी स्वतंत्र कलश ठेवून ओला व सुका कचरा महापालिकेच्या घंटागाडीकडे सुपूर्द करावा. नाल्या किंवा जलस्रोतांमध्ये कचरा टाकू नये. सुरक्षितता व वीजजोडणी: मंडपात अधिकृत तात्पुरती वीजजोडणी परवानाधारक कंत्राटदाराकडूनच घ्यावी. धोकादायक हुक किंवा अनधिकृत आकडे टाकल्यास कारवाई होईल. अग्निसुरक्षेसाठी अग्निशामक यंत्रे, वाळूच्या बादल्या, आपत्कालीन मार्ग व सीसीटीव्ही यंत्रणा सज्ज ठेवावी. ध्वनिप्रदूषण व कायदा-सुव्यवस्था: ध्वनिक्षेपक यंत्रणेसाठी सक्षम प्राधिकरणाची परवानगी घेऊन ठरवून दिलेल्या वेळ व डेसिबल मर्यादेचे पालन करावे. रुग्णालये व शाळा यांसारख्या शांतता क्षेत्रात विशेष काळजी घ्यावी. कोणत्याही समाजाच्या भावना दुखावणारे फलक, देखावे, घोषणा किंवा सोशल मीडिया पोस्ट प्रसारित करू नयेत. उल्लंघन केल्यास कडक कारवाई: विनापरवानगी मंडप उभारणे, वाहतुकीस अडथळा, अनधिकृत वीजजोडणी, रस्त्यांचे नुकसान किंवा ध्वनी नियमांचे उल्लंघन केल्यास संबंधितांवर दंडात्मक व फौजदारी गुन्हे दाखल केले जातील. तसेच अनधिकृत मंडप निष्कासित करून त्याचा खर्च मंडळाकडून वसूल केला जाईल. सर्व गणेशोत्सव मंडळांनी आणि नागरिकांनी स्वच्छ जालना - सुंदर जालना, सुरक्षित गणेशोत्सव हा संकल्प प्रत्यक्षात आणण्यासाठी प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन आयुक्त अंजली शर्मा यांनी केले आहे.

# संपादकीय

## नव्या निराशा?

नेपाळचा राजकीय इतिहास हा नेहमीच अस्थिरतेच्या आणि अचानक येणाऱ्या परिवर्तनांच्या लाटांनी वेढलेला राहिला आहे. राजेशाहीचा अंत, माओवादी बंडखोरी आणि त्यानंतर लोकशाहीचा स्वीकार अशा अनेक वळणांवरून गेलेला हा देश सध्या पुन्हा एकदा एका मोठ्या अंतर्गत संघर्षाच्या आणि तीव्र असंतोषाच्या उंबरठ्यावर उभा आहे. मार्च २०२६ च्या निवडणुकांमध्ये ज्या 'जनरेशन झेड' म्हणजेच तरुण पिढीने एका मोठ्या क्रांतीची अपेक्षा ठेवून रॅपर आणि काठमांडूचे माजी महापौर बालेंद्र शाह यांच्या हाती देशाची सूत्रे सोपवली होती, तीच तरुण पिढी आज त्यांच्याविरोधात रस्त्यावर उतरली आहे. ज्यांनी सत्तेच्या शिखरावर बसवले, त्यांनीच अवघ्या काही महिन्यांमध्ये विरोधाचा झेंडा हाती घेतल्यामुळे नेपाळमधील हा संघर्ष केवळ राजकीय उरलेला नाही, तर एका सामाजिक आणि आर्थिक असंतोषाचा ज्वालामुखी बनला आहे. या ताज्या आंदोलनांची ठिणगी काठमांडूच्या रस्त्यांवर पडली. एका राईड-शेअरिंग ड्रायव्हरने (गणेश नेपाळी) म्युनिसिपल पोलिसांसोबत झालेल्या वादामधून आणि प्रशासकीय जाचाला कंटाळून केलेल्या आत्मदहनानंतर तरुणांच्या संतापाचा उद्रेक झाला; परंतु हे केवळ एका घटनेचे तात्कालिक पर्यवसान नाही. या आंदोलनामागे खोलवर रुजलेली कारणे आहेत. शाह यांच्या सरकारने शहराच्या सुशोभीकरणाच्या आणि शिस्तीच्या नावाखाली हजारो गरीब आणि भूमिहीन झोपडीधारकांना पुनर्वसनाशिवाय बेघर केले. गरिबांना थेट रस्त्यावर आणणाऱ्या या मोहिमांमुळे प्रशासकीय क्रूरतेचा चेहरा समोर आला आणि नेपाळमध्ये नव्याने आंदोलन पेटले. आर्थिक संकट, बेरोजगारी आणि वाढत्या महागाईमुळे आधीच होरपळत असलेल्या नेपाळी तरुणांना नवीन सरकारकडून रोजगाराच्या संधी आणि सहानुभूतीची अपेक्षा होती; परंतु त्याऐवजी त्यांना दंडात्मक कारवाया, प्रशासकीय हुकूमशाही आणि गरिबांना टार्गेट करणारी धोरणे पाहायला मिळाली. शाह यांच्या विरोधातील या तीव्र नाराजीचे विश्लेषण करताना त्यांच्या कार्यपद्धतीचा अभ्यास करणे गरजेचे ठरते. शाह हे पारंपरिक नेपाळी राजकारणाला कंटाळलेल्या मतदारांसाठी बदलाचा एक मोठा चेहरा म्हणून पुढे आले होते. त्यांचा आक्रमक आणि स्पष्टवक्ता स्वभाव तरुणांना आकर्षित करत होता; मात्र सत्तेवर आल्यानंतर हाच आक्रमक स्वभाव एकाधिकारशाही आणि असंवेदनशीलतेमध्ये बदलल्याचा आरोप आता होत आहे. विरोधकांचे म्हणणे ऐकून न घेणे, 'सोशल मीडिया' आणि माध्यमांवर अघोषित बंधने आणण्याचा प्रयत्न करणे आणि जमिनीवरील गरिबांच्या वास्तववादी समस्यांकडे पूर्णपणे डोळेझाक करणे, यामुळे त्यांची लोकप्रियता कमालीची घसरली आहे. ज्या लोकशाही आणि मानवी हक्कांच्या नावावर त्यांनी तरुणांची मते मिळवली, त्याच हक्कांची पायमल्ली नव्या राजवटीत होत असल्याचा सूर उमटत असल्यामुळे शाह सध्या कमालीचे बचावात्मक भूमिकेत आले आहेत.

नेपाळमधील या अंतर्गत राजकीय आणि सामाजिक अस्थिरतेचे पडसाद केवळ त्यांच्या सीमांपुरते मर्यादित राहू शकत नाहीत, कारण नेपाळचे भारताशी असलेले संबंध अत्यंत जिव्हाळ्याचे आणि भौगोलिकदृष्ट्या संवेदनशील आहेत. दोन्ही देशांमध्ये असलेली खुली सीमा ही एका बाजूने दोन्ही संस्कृतींना जोडणारा दुवा असली, तरी नेपाळमधील अस्थिरतेच्या काळात ती भारताच्या अंतर्गत सुरक्षेसाठी मोठी चिंतेची बाब ठरते. नेपाळमध्ये अंतर्गत संघर्ष वाढल्यास किंवा कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास सीमेपलीकडून होणारी गुन्हेगारी, अमली पदार्थांची तस्करी आणि भारतविरोधी घटकांची घुसखोरी वाढण्याचा थेट धोका निर्माण होतो. नेपाळमध्ये जेव्हा जेव्हा अंतर्गत असंतोष किंवा राजकीय पोकळी निर्माण होते, तेव्हा चीनसारख्या परकीय शक्तींना तिथे आपला प्रभाव वाढवण्याची मोठी संधी मिळते. नेपाळला या संकटातून बाहेर काढण्यासाठी शाह यांना त्यांच्या प्रशासकीय भूमिकेत बदल करून गरिबांना आणि तरुणांना विश्वासात घ्यावे लागेल. दरम्यान, भारतासाठी हा काळ अत्यंत सावधगिरीने पावले टाकण्याचा आहे. नेपाळचा हा अंतर्गत संघर्ष शांत व्हावा आणि तिथे स्थिर सरकार राहावे, यातच भारताचेही हित सामावले आहे. शेजारी देशातील शांतता हीच भारताच्या सीमेवरील सुरक्षेची सर्वात मोठी हमी असू शकते.

राजकीय दृष्टिकोनातून पाहिले तर नेपाळमध्ये 'व्यक्तिकेंद्री बदल' किती टिकाऊ असतो, हा प्रश्न पुन्हा एकदा समोर आला आहे. आंदोलनातून निर्माण झालेल्या सरकारने प्रशासनातील सुधारणा करण्यासाठी सक्षम यंत्रणा उभी केली नाही, तर लोकांचा विश्वास डळमळीत होणे स्वाभाविक आहे. या संपूर्ण परिस्थितीकडे भारताने केवळ शेजारी देशातील अंतर्गत राजकारण म्हणून पाहता कामा नये. भारत आणि नेपाळ यांचे संबंध सांस्कृतिक, आर्थिक, धार्मिक आणि सामाजिकदृष्ट्याही अतिशय जवळचे आहेत. बिघडलेल्या संबंधांचा पहिला परिणाम सुरक्षा व्यवस्थेवर होऊ शकतो. खुल्या सीमेमुळे अस्थिरतेच्या काळात तस्करी, बनावट चलन, शस्त्रांची हालचाल किंवा गुन्हेगारी नेटवर्क सक्रिय होण्याचा धोका वाढतो. भारत आणि नेपाळ यांच्यातील सुरक्षा सहकार्य त्यामुळे अधिक महत्त्वाचे ठरते. याशिवाय भारत हा नेपाळचा सर्वात मोठा व्यापार भागीदार आहे. सीमावर्ती भागातील आंदोलन, वाहतूक अडथळे किंवा प्रशासनातील अस्थिरता यामुळे पुरवठा साखळी विस्कळीत होऊ शकते. त्याचा परिणाम दोन्ही देशांमधील उद्योग आणि सीमाभागातील अर्थव्यवस्थेवर होऊ शकतो.

### जांभेकर जी

धन्यवाद जांभेकर
दर्पण मूळ वृतपत्र
स्फुर्ती घेई आपली
चालू होई नवे सत्र

रक्षा सदा स्वातंत्र्य
वृत्तपत्र प्रिय मित्र
कधी वाटे कडवट
औषधप्रभावी मात्र

अंधाधुंद सत्ताधीश
अंकुश ठेवे वृतपत्र
बांधू नका साखळी
मुक्तराहो तया गात्र

समाज प्रबोधनाचे
कार्यकरी ते पवित्र
लोकशाहीचा स्तंभ
बदले चांगले चित्र

एकसंघ हो समाज
बांधूनि ठेवते सूत्र
विधात्या सारखाचं
वावर त्याचा सर्वत्र

दिप मार्गदर्शीअसा
असे कुठे रे अन्यत्र
डंबाचार अहंकार
स्वंराचार नकोमात्र

**- हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६**

**पाणी आडवा पाणी जिरवा**

### शब्द ..

जपून वापरावे शब्द
कसे बोलायचे शिका
कसबआणावे जिव्हा
शब्दानेमाणूस जिंका

शब्दां किंमत अमोल
दवडू नये वाफ फुका
शब्द स्पोटाचे समोर
अणूबाँब पडे फिका

ताकद खरी ओळखा
उजळे हजारो उल्का
शब्दांनी लागते आग
शब्द उजळे शलाका

शब्दाचे राखावे मोल
कधी न द्यायचाधोका
शब्दांने जिंकले युध्द
मिळता सूज्ञास मोका

वेळ असो कसलीही
दिल्या शब्दांला राखा
वेळ येता ती अवघड
शब्द होतो पाठीराखा

बदलून टाके आसमंत
शब्दांचाकठोर फटका
ताळ्यावरआणे भल्या
अंतर्मना बसवे चटका

माणूस तोचि रे सच्चा
असे शब्दांचा पक्का
अर्थमिळेलं जीवनास
आत्म्याला ना धक्का

**- हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६**

# ग्रामसेवक बनणे म्हणजे तीन पिढ्यांचे पुण्य!

ग्रामसेवकांनी सरपंच च्या नादाला लागून चुकीची कामे करू नयेत.सरपंच सांगतो म्हणून बोगस नोंदी करू नयेत. कारण सरपंचाला बारा खून आणि तेरा बलात्कार आणि चौदा गुन्हे माफ असतात. त्यांच्या पाठीमागे कमीशनखोर, हरामखोर आमदार खासदार चा हात असतो.मुळातच भ्रष्टाचार करण्यासाठीच तो निवडणूक लढतो.मतदारांना मताचे पैसे वाटतो.हे कोणत्या ग्रामसेवकला माहिती नाही?तरीही ग्रामसेवक हा सरपंचच्या जाळ्यात अडकतो कसा? तुम्ही पैसे देऊन नोकरीत लागले नाहीत ना!मग कशाला सरपंचचा हेवा करतात? सरपंच चे,गांधी त्याचे,घर त्याचे,शेत त्याचे, भाऊबंद त्याचे,जातवाले त्याचे, आमदार त्याचा, खासदार त्याचा, मंत्री त्याचा,राशन दुकान त्याचे, रेतीचे डंपर त्याचे.तुमचे कोण असतो?बीडीओ सीईओ?ते सुद्धा ऐन वेळी बगल वर करतात आणि तुम्हाला वाऱ्यावर सोडून देतात.कमीशन मधून,लांचखोरी मधून ते तुमच्या कडून हिस्सा घेतात. पण जेंव्हा तुमच्या पगारातून लाचखोरी,अफरतफरी वसुली केली जाते तेंव्हा ते लाचखोरीचा पैसा परत करतात का? तुमच्या कडे ढुंकूनही पाहात नाहीत.

ग्रामसभा घेणे हा कायदा आहे.नियम आहे. तर मग ग्रामसभेत नागरिक प्रश्न विचारणारच.ग्रामसेवकाने उत्तर दिलेच पाहिजे.का देत नाही उत्तर? नक्कीच काहीतरी गौडबंगाल असेल म्हणूनच ना!जर कुठेही अफरातफर नसेल तर सर्व रेकॉर्ड उघड करून दाखवा.मागितली ती माहिती विचारली तेंव्हाच देऊन टाका.काम पेंडींग ठेवू नका.असे केले तर संध्याकाळी मस्त पिऊन खाऊन चांगले जीवन जगा.कोण कशाला त्रास देईल?

सरकारी नोकरीत नियम आहे.जर नोकर शारीरिक किंवा मानसिक व्याधी ग्रस्त असेल तर त्याला रिस्की जॉब वर ठेवत नाहीत.असा कोणी ग्रामसेवक डिकॅटराईझ होऊन पंचायत समिती कि जिल्हा परिषद मधे कारकून म्हणून काम करू शकतो.पण गैरमार्गाने पैसा कमवायचा असेल तर ग्रामसेवक जिवाची पर्वा करीत नाहीत.पैसा प्रिय कि जिवन प्रिय?ते आधी ठरवून घेतले पाहिजे.मरेपर्यंत चुकीची कामे करू नयेत.

आता ग्रामसेवकांना पगार चांगला मिळतो.तितक्या पगारात शाळा कॉलेज, दवाखाना,सहल ,लग्न वगैरे होते.पण लोभात पडले तर जिवन खराब होणारच!नका करू असे.

मोर्चा काढून मेला तो जिवंत होणार नाही.संप करून



कायदा बदलणार नाही.उलट सरकार कंटाळले तर नवीन भरती सुरू करु शकते.जसे मुख्यमंत्री वसंतदादा पाटील यांनी केली होती.लाखो करोडो उच्चशिक्षित तरूण बेरोजगार फिरत आहेत.थोडे इकडे लक्ष द्या. आता सरकारी नोकरी मिळत नाही.लांच दिल्याशिवाय नोकरी मिळत नाही.मिळाली तर ती टिकवली पाहिजे.अफरातफर केली आणि बडतर्फ झाले तर मॅट ,कॅट,कोर्ट कचेरी करण्यात आयुष्य बरबाद होते.रिटायर झाल्यानंतर किंवा मेल्यानंतर निकाल दिला जातो.मग काय स्वर्गात नोकरी करणार ?तेथे तर बायको पोरं सोबत नसतात. सरकारी नोकरी म्हणजे पृथ्वीवरील स्वर्ग आहे. काम न करता पगार मिळण्याचे हेच एकमेव साधन आहे.वरून चिरीमिरी , ख्यालीखुशाली, कमीशन मिळतच असते. आणखी काय पाहिजे?मान सन्मान प्रोटेक्शन मिळते. पेन्शन मिळते.मरने के पहले और मरनेके बाद भी.जरूरत से जादा.नोकरीत असताना दारू पिऊन मेला तरीही बायकोला किंवा पोराला नोकरी मिळते.आणखी काय पाहिजे?इतके भाग्य राम, कृष्ण,बुद्ध, गांधी,नेहरु यांच्या वाट्याला सुद्धा आले नाही. त्यापेक्षा भारतातील नोकर भाग्यवान आहेत.

नोकरी नसलेल्या तरूणांचे लग्न सुद्धा होत नाही.भारतीय महिला नोकरी नसलेल्या पुरूषांना नाकारतात.तुम्हाला तर खूप चांगली नोकरी मिळाली आहे.हे तुमचे भाग्य आहे.तीन पिढ्यांचे पुण्य होते म्हणून तुम्ही ग्रामसेवक बनलेत.तर मग इमानदारीने काम करा.आनंदात राहा. गावकऱ्यांनाही आनंदात जगू द्या.जगा आणि जगू द्या!

**... शिवराम पाटील**
**जळगाव**
**What's up साभार**

# सावधान!हिमालयातील विकासकामांचा अतिरेक मानवासाठी काळ बनत असून निसर्ग कोपतो आहे व संपुर्ण जीवसृष्टी धोक्याच्या उंबरठ्यावर येऊन ठेपली आहे.

दिनांक २६ ऑगस्ट २०२६ चे नेपाळमधील महातांडव नेपाळला अंध:कारात नेणारे ठरले.ना भुतो ना भविष्यती अशा प्रकारचा विनाशकारी महाप्रलय जगाने पहाला.यात हजारोंच्या संख्येने जीवीत हाणी झाली असूनही ६ हजारपेक्षा जास्त नागरिक आजही बेपत्ता आहेत व लाखोंच्या संख्येने तेथील लोक बेघर झाले आहेत ही अत्यंत दु:खद आणि अंगावर शहारे येणारी घटना संपूर्ण जगाने आपल्या उघड्या डोळ्यांनी पहाली.तरीही जगातील अनेक देश विकासाच्या नावाखाली हिमालयावर किंवा निसर्गावर वेगवेगळ्या पध्दतीने घणाघाती प्रहार करीत आहेत आणि त्याचेच प्रायश्चित्त आज नेपाळ सारख्या देशाला भोगावे लागत आहेत. हिमालय परिसरातील दिवसेंदिवस महाप्रलयाची चिंता वाढत आहे कारण पाऊस,भूस्खलन, ग्लेशियर वितळणे किंवा भूकंपासारख्या घटना या क्षेत्रात अचानक विनाशकारी महापुराचा धोका वाढु शकतो. हिमालयाच्या बाबतीत विचार केला तर यांच्या लगतच्या देशांना धोका निर्माण झाला आहे व पुढे चालुन याचे रूपांतर महाविनाशकारी होऊ शकते याचे जिवंत उदाहरण नेपाळच्या रूपात जगाने पाहिले.हिमालयाच्या लगतच्या देशांमध्ये भारत, नेपाळ,चीन(तिबेट परिसर), भूतान तर पूर्णपणे हिमालयीन प्रदेश आहे,पाकिस्तान आणि काही भौगोलिक नोंदीमध्ये अफगाणिस्तान किंवा म्यानमारचा काही सिमावर्ती भाग जोडला जातो.परंतु मुख्यत्वे करून हिमालया लगतचे पाच देश मानले जातात.त्यामुळे हिमालया लगतच्या विकासकामामुळे व जलविद्युत प्रकल्पाच्या उभारणीने या पाचही देशांसाठी महाविनाशाचा आलाराम नेपाळमधून २६ ऑगस्टला झाला आहे. त्यामुळे या पाचही देशांना हिमालयालगतचे विकास कामे ताबडतोब थांबविने किंवा नियंत्रित ठेवणे गरजेचे आहे व हिमनद्यांचे संरक्षण करण्यासाठी तातडीने कठोर पावले उचलण्याची आवश्यकता आहे. मुख्यत्वेकरून चीन हिमालया लगतच्या तिबेट परिसरात एकापाठोपाठ एक नवीन-नवीन जलविद्युत प्रकल्प उभारत आहे. सोबतच रेल्वे,रस्ते वाहतूक उद्देशाने हिमालयालयामध्ये बोगदे तयार करीत असून खनण सुरू आहे.त्यामुळे आजच्या परिस्थितीत हिमालयाला सर्वात जास्त खिळखिळा करण्याचे काम चीन करीत आहे. त्यांचाच परिणाम आज वॉटर बॉम्बच्या रूपात व महाप्रलयाच्या रूपात नेपाळला भोगावा लागतो आहे.चीनने सध्याच्या परिस्थितीत आपल्या लगतच्या देशांच्या भोवताल मृत्यूची भिंत उभारल्याचे स्पष्ट दिसून येते.स्वत:चे वर्चस्व,स्वत:चा विकास व शेजारच्या राष्ट्रांवर आपली पकड रहावी या उद्देशाने चीन विनाशकारी कार्य निरंतर करीत आहे. जगात वाढती लोकसंख्या,वाढते औद्योगिकीकरण, युद्धजन्य परिस्थिती,जंगलतोड यामुळे हवामानात अवश्य बदल होत आहे आणि याचे प्रायश्चित्त संपूर्ण जग भोगत आहे यात दुमत नाही.परंतु चीन स्वत:च्या स्वार्थासाठी आपल्या शेजारच्या देशांना भयभीत करीत असून मृत्यूच्या खाईत लोटत आहे ही बाब नेपाळमधील नैसर्गिक विनाशकारी महाप्रलयावरून सिद्ध होते.आज दोन आठवडे उलटुन गेल्यानंतरही हजारो नागरिक अद्यापही बेपत्ता आहेत तरीही शोध मोहीम सुरूच आहे. अशा कठीण घडीला जगातील संपूर्ण देशांनी व संयुक्त राष्ट्रसंघटनेनी सर्वोतोपरी सरळ हातांनी मदत करण्याची गरज आहे.बदलत्या हवामानामुळे जागतिक तापमानवाढ मर्यादा ओलांडल्याने संपूर्ण जगाला याचे गंभीर परिणाम भोगावे लागणार आहेत. नेपाळची भीषण नैसर्गिक आपत्ती ही निसर्गाची फक्त एक झलक आहे.परंतु यापुढे जगात भयानक महाप्रलय, सुनामी, भुकंप,हिमकडा कोसळणे, भूस्खलन,ज्वालामुखीचा उद्रेक अशा भयावह घटना ओढावण्याची दाट शक्यता आहे.त्यामुळे चीन सारख्या देशाने निसर्गावर अतीरेक करने थांबवावे.आज ळ,भारत,पाकिस्तान,चीन (तिबेट परिसर), भूतान या देशातील हिमालयातील अनेक हिमकडे धोकादायक श्रेणीमध्ये आले आहेत.यामुळेच निसर्गाचे संतुलन दीवसें-दीवस डगमगतांना दिसत आहे.मानवतेच्या अतिरेकामुळे जागतिक तापमानात वाढ झाल्याने पृथ्वीवरील होणारे गंभीर दुष्परिणाम रोखण्याची संधी मानवाने पुर्णतः गमावली आहे.त्याचेच प्रायचित्य नेपाळसह जगातील अनेक देशांना वेगवेगळ्या रूपात भोगावे लागत आहे.तरीही धोकादायक स्थितीत असलेले तापमान सुरक्षित पातळीवर कसे आणता येईल याकडे हवामान शास्त्रज्ञांचे लक्ष लागले आहे.१९ व्या शतकाच्या मध्यातील तापमानाच्या तुलनेत १.५ अंश सेल्सिअस तापमानवाढीचे उद्दिष्ट शास्त्रज्ञांनी सर्वसाधारणपणे स्विकारले होते.परंतु आता २ अंश सेल्सिअस तापमान वाढीमुळे संपूर्ण जीवसृष्टी व पृथ्वी यांच्यावर गंभीर परिणाम होऊ शकतात असे शास्त्रज्ञांच्या माध्यमातून सांगितले जात आहे.यावरून स्पष्ट होते वाढते तापमान, दिवसेंदिवस वाढत असलेली समुद्राची पातळी व वाढत्या तापमानामुळे ग्लेशियर वितळून होणारा महाप्रलय आणि यामुळे निसर्गावर होणारे दुष्परिणाम याचे गंभीर परिणाम पृथ्वीतलावरील प्रत्येक जीवजंतूंना भोगावे लागतील.त्यामुळे जगातील देशांनी वेळ न गमावता ताबडतोब निसर्गाच्या संगोपनाच्या दृष्टीने योग्य पाऊल उचलले पाहिजे. अन्यथा संपूर्ण पृथ्वीचा विनाश अटळ आहे.भारतात हवामान बदलामुळे (उश्रळारींश उहरपसश) हिमालयातील हिमनद्या (Glacieñ) आणि त्यांच्या वितळण्यामुळे तयार होणारी हिमनदी सरोवरे (ऋश्ररलळरश्र डरज्ञशी) मोठ्या प्रमाणावर धोकादायक स्थितीत आली आहेत. भारताच्या राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने (छऊच-) राष्ट्रीय ऋडजऋ जोखीम कमी करण्याच्या कार्यक्रमांतर्गत देशातील १९५ हिमनदी सरोवरांना 'अतिसंवेदनशील' आणि 'धोकादायक' म्हणून चिन्हांकित केले आहे. म्हणजे भारताला हिमनद्यांचा(ग्लेशियर वितळण्याचा) धोका केव्हाही उद्भवू शकतो याला नाकारता येत नाही. सध्याच्या परिस्थितीत भारतातील उत्तराखंड, केदारनाथ, झारखंड, ओडिशा, बिहार , उत्तरप्रदेश व इतर भागात जे पावसाचे थैमान व नद्यांच्या पुरांचे वाढते प्रमाण हा सर्वप्रकार ग्लेशियर वितळणे व निसर्गावर होत असलेला अतिरेक यामुळेच देशासह जगात धोकादायक परिस्थिती निर्माण झाली आहे.सध्याच्या परिस्थितीत संपूर्ण जग विनाशाच्या उंबरठ्यावर येऊन बसले आहे,यात जगातील युद्धजन्य परिस्थिती, जंगलतोड,वाढते करण,औद्योगिक,हिमालय परिसरात जलविद्युत प्रकल्प उभारणी,वाढती लोकसंख्या यामुळे आकाश-पाताळ,स्थल,जल,वायू यांना मोठा धोका निर्माण झाला आहे त्याचे प्रायश्चित्त मानवजातीसह संपूर्ण सृष्टीला भोगावे लागणार आहे.त्यामुळे नेपाळची महाविनाशकारी तांडव पहाता हिमालय लगतच्या देशांनी(चीन,भारत,नेपाळ, पाकिस्तान, भूतान) यांनी विकास कामे करतांना सावधगिरी बाळगावी.

जय हिंद!

**लेखक**
**रमेश कृष्णराव लांजेवार**
**( स्वतंत्र पत्रकार )**
**मो.नं.९९२१६९०६७९,**
**नागपूर.**

### पत्रकार...

पत्रकार दुधारीतलवार
घाली काळजा थेटवार
जिथे ना पोचे रविकवी
लीलया प्रकटे आरपार

जणूं सरस्वती अवतार
दावी लेखणी चमत्कार
रसांचाअमृतकलश
नटराजाचा साक्षात्कार

दीनदुबळ्या तारणहार
वेदना पुसे तो हळूवार
आवाज मुक बधिरांचा
शोषीतांचा देई आधार

त्यालाचं भिते दहशत
जीवावर सदैव उदार
भिडभाड माहीत नाही
ना उपकार ठेवे उधार

करी अद्भुत चमत्कार
रेअष्टावधानी जादुगार
कधी तया करे विचार
त्याला ना पेंशन पगार

रे प्रसव वेदना असह्य
जन्मावा लागे पत्रकार
निदान मानावे आभार
नव युगाचा तो हुंकार

**- हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६**

### मूक ..

बोलून जातो खूप
रे कधी मूक मोर्चा
काही ना करताचं
अधिक चाले चर्चा

आगळी प्रतिक्रिया
झणझणीत मिर्च्या
ताकद दिसते खरी
हलवूशकते खुर्च्या

मुखस्तंब प्रकरणां
फुटते सहज वाचा
मूक शब्दांत शक्ती
दणकट असे ढाचा

काळजात आरपार
घुसतो पुरता टोचा
लपलेल्या गुन्ह्याचा
बरोबर होतो लोचा

हवेकशास परिश्रम
प्रकाशा येतो सच्चा
आवळले जाईफास
अंधारातजरी लुच्चा

जबाबदारीने वागावे
उलटा घुसेल बोरचा
शांतमार्गी आंदोलन
विटा नकोत कच्च्या

**- हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६**

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक शामसुंदर चितोडा यांनी **जगमित्र ऑफसेट भोकरदन नाका, संभाजीनगर ता.जि.जालना ४३१२०३ (महाराष्ट्र)** येथे छापून, दैनिक चकमक कार्यालय जालना येथे प्रसिद्ध केले. पि.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी ✲ यांची राहील. **संपादक शामसुंदर चितोडा, कार्यकारी संपादक कैलास फुलारी** (जालना जिल्हा न्यायालयाअंतर्गत) RNI NO.MHMAR/26/A4110 **मो.न.९४२२७९६०८८, ९४०३४९४४२२**

# जालना जिल्ह्यातील २ हजार एससी-एसटी नवउद्योजकांना सक्षम करण्याचा संकल्प

## विशेष विक्रेता विकास कार्यक्रमात रत्नदीप कांबळे यांची घोषणा; शासकीय खरेदीतील सहभाग वाढविण्याचे आवाहन

जालना, दि. २ : शासकीय खरेदी प्रक्रियेत अनुसूचित जाती-जमातीतील उद्योजकांचा सहभाग वाढवून त्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याच्या उद्देशाने जालन्यात 'नॅशनल एससी-एसटी हब' आणि 'बुद्धिस्ट एंटरप्रेनर्स असोसिएशन चेंबर्स ऑफ कॉमर्स' यांच्या संयुक्त विद्यमाने विशेष विक्रेता विकास कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात नवउद्योजकांना शासकीय खरेदी प्रक्रिया, टेंडर प्रक्रिया, उद्योगवाढ, बँकिंग सुविधा तसेच विविध शासकीय योजनांची माहिती देण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून बोलताना बुद्धिस्ट एंटरप्रेनर्स असोसिएशनचे संस्थापक रत्नदीप कांबळे यांनी जालना जिल्ह्यातील २ हजार अनुसूचित जाती-जमातीतील नवउद्योजकांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याचा संकल्प जाहीर केला. नवउद्योजकांनी केवळ पारंपरिक रोजगाराच्या संधींच्या प्रतीक्षेत न राहता उपलब्ध असलेल्या शासकीय योजनांचा आणि खरेदी प्रक्रियेतील संधींचा लाभ घेत उद्योग उभारावेत, असे आवाहन त्यांनी केले.

शासकीय खरेदीत सहभाग वाढविण्याची गरज शासकीय विभागांकडून विविध वस्तू व सेवांची मोठ्या प्रमाणावर खरेदी केली जाते. या खरेदी प्रक्रियेत अनुसूचित जाती-जमातीतील उद्योजकांसाठी राखीव असलेल्या संधींचा पुरेपूर लाभ घेण्याची गरज आहे. शासकीय खरेदीमध्ये मागासवर्गीय उद्योगांसाठी ४ टक्के कोटा राखीव असतानाही प्रत्यक्षात सध्या केवळ सुमारे २ टक्के सहभाग असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

हा सहभाग वाढविण्यासाठी अनुसूचित जाती-जमातीतील नवउद्योजकांनी मोठ्या संख्येने पुढे येऊन शासकीय टेंडर प्रक्रियेत सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले. शासकीय खरेदी प्रक्रिया समजून घेणे, आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करणे, निविदा प्रक्रियेत सहभागी होणे आणि उद्योगाची क्षमता वाढविणे यासाठी अशा कार्यक्रमांची भूमिका महत्त्वाची असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले. उद्योग उभारणीसाठी बँकिंग सुविधांचा लाभ घ्या कार्यक्रमातील प्रमुख मार्गदर्शक अग्रणी बँक व्यवस्थापक मंगेश केदार यांनी नवउद्योजकांना व्यवसायाच्या विविध संधी आणि बँकिंग सुविधांबाबत मार्गदर्शन केले. उद्योग सुरू करण्यासाठी उपलब्ध असलेल्या कर्ज योजना, बँकिंग प्रक्रिया, आर्थिक नियोजन आणि व्यवसायवृद्धीसाठी आवश्यक बाबींची माहिती त्यांनी दिली. शासकीय योजनांचा लाभ घेऊन उद्योग उभारण्याबरोबरच रोजगारनिर्मितीवर भर देण्याची गरज असल्याचे त्यांनी



### 'उद्योजक बना, रोजगारनिर्मिती करा'

अनुसूचित जाती-जमातीतील तरुणांनी शासकीय योजनांचा केवळ लाभार्थी म्हणून विचार न करता उद्योजक म्हणून पुढे येण्याची गरज आहे. उद्योग उभारून स्वतःच्या आर्थिक प्रगतीसोबतच इतरांसाठी रोजगाराच्या संधी निर्माण करण्यावर भर देण्यात यावा. शासकीय खरेदीतील उपलब्ध संधींचा लाभ घेऊन नवउद्योजकांनी आपला व्यवसाय विस्तारावा, असा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला.

सांगितले. 'नोकरी मागणारे न बनता नोकरी देणारे व्हा,' असा संदेश देत नवउद्योजकांनी आत्मविश्वासाने व्यवसाय क्षेत्रात उतरावे, असे आवाहन करण्यात आले. नवउद्योजकांना टेंडर प्रक्रियेची माहिती या विशेष विक्रेता विकास कार्यक्रमाच्या माध्यमातून अनुसूचित जाती-जमातीतील उद्योजकांना शासकीय खरेदी व्यवस्थेची माहिती मिळाली. शासकीय विभागांना आवश्यक असलेल्या विविध वस्तू, साहित्य व सेवांचा पुरवठा करण्यासाठी उद्योजकांना उपलब्ध असलेल्या संधी, टेंडरमध्ये सहभागी होण्याची प्रक्रिया आणि उद्योग विस्तारासाठी आवश्यक नियोजन याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.



जिल्ह्यातील अधिकाधिक नवउद्योजकांनी या संधीचा लाभ घेतल्यास स्थानिक पातळीवर उद्योगांची संख्या वाढण्याबरोबरच रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होऊ शकतात, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कुलदीप गरड यांनी केले, तर आभार संतोष दाभाडे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी भगवान पाडळे, अमोल खरात, भीम उद्योग अभियानाचे राजेश राऊत, संजय भालेकर, मिलिंद सावंत, राजेश सदावर्ते, संतोष दाभाडे, राजेंद्र हिवाळे आदींनी परिश्रम घेतले. यावेळी आरपीआयचे महेंद्र रत्नपारखे, दैनिक शुभ प्रभातचे संपादक अच्युत मोरे, राहुल खरात, अशोक रगडे, विजय खरात, दीपक हिवाळे, दैनिक चकमकचे समाधान खरात यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर, उद्योजक व नवउद्योजक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# तब्बल १६८ गोविंदा जखमी

मुंबई (विशेष प्रतिनिधी) : ढाक्कू माक्कूम, ढाक्कू माक्कूम....बोल बजरंग बली की जय., गोविंदा रे गोपाळा या गाण्यावर थिरकत थरांवर थर रचत शनिवारी मुंबईतील विविध ठिकाणी आयोजित करण्यात आलेल्या दहीहंडी फोडण्याचा प्रयत्न विविध गोविंदा मंडळांनी केला. मात्र, हंडी फोडण्यासाठी थरांवर थर रचताना काहींचे मनोरे कोसळून त्यातील गोविंदा जखमीही झाले आहे. सायंकाळी सहा वाजेपर्यंत प्राप्त झालेल्या माहितीनुसार मुंबई महापालिका आणि शासकीय रुग्णालयंमध्ये तब्बल १६८ जखमी गोविंदा दाखल झाले होते. यातील २९ जखमींना रुग्णालयात दाखल करण्यात आले तर उर्वरीतांपैकी ८१ जवानांवर उपचार सुरु होते आणि ५८ गोविंदांवर उपचार करून सोडून देण्यात आले होते. (ऊरहळ क्रपवळ २०२६) मुंबई महानगरीची एक महत्त्वाची सांस्कृतिक ओळख असणा-या दहीहंडीच्या कार्यक्रमात गोविंदा जखमी होण्याचे प्रकार घडू शकतात, ही संभाव्यता लक्षात घेऊन महानगरपालिकेच्या शीव येथील लोकमान्य टिळक सर्वो पचार रुग्णालय, परळ येथील राजे एडवर्ड स्मारक (के. ई. एम.) रुग्णालय आणि मुंबई सेंट्रल येथील नायर रुग्णालय आणि विशेष उपचार सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. तसेच १६ उपनगरीय रुग्णालयातही १०५ रूग्णशय्या सज्ज ठेवण्यात आले आहेत. या रुग्णालयांमध्ये प्रत्येकी ५ ते १० खाटांची व्यवस्था सज्ज ठेवण्यात आली होती. शनिवारी सकाळपासून मुंबईतील विविध भागांमध्ये मंडळांनी तसेच राजकीय व्यक्तींनी बांधलेल्या हंड्या फोडण्यासाठी गोविंदा पथके गाड्यांनी रवाना झाली होती. त्यामुळे संपूर्ण मुंबईत गोविंदांचा दर्शन घडत उंच लावलेल्या हंडया फोडण्यासाठी प्रत्येक मंडळांच्यावतीने मानवी मनोरे रचत थरांवर थर लावण्याचा प्रयत्न केला होता. काहींना यात यश होते तर काही पथकांच्या माध्यमातून केवळ सलामी दिली जात होती. परंतु हंडी फोडताना रचले जाणारे हे थर कोसळल्यामुळे अनेक ठिकाणी गोविंदा जखमी झाल्याच्या घटना पहायला मिळत होत्या. (ऊरहळ क्रपवळ २०२६) मुंबईतील विविध सरकारी व पालिका रुग्णालयांकडून रात्री ९वाजेपर्यंत प्राप्त झालेल्या माहितीनुसार, दहीहंडी उत्सवादरम्यान एकूण १६८ गोविंदा जखमी झाले आहेत. यापैकी २९ जणांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. तर ८१ जणांवर उपचार सुरू आहेत, तर ५८ जणांना उपचारानंतर घरी सोडण्यात आले आहे.

## मोदींचा मेट्रोने प्रवास; विद्यार्थ्यांशी व प्रवाशांशी साधला संवाद

नवी दिल्ली : दिल्लीतील श्री राम कॉलेज ऑफ कॉमर्सच्या शताब्दी सोहळ्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारी दिल्ली मेट्रोने प्रवास केला. ५ सप्टेंबर रोजी शिक्षक दिनानिमित्त एसआरसीसीचा शताब्दी सोहळा आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाला जाण्यापूर्वी मोदींनी मेट्रो प्रवासादरम्यान विद्यार्थी आणि इतर प्रवाशांशी संवाद साधला. मेट्रो प्रवासादरम्यान पंतप्रधान मोदी विद्यार्थ्यांशी गप्पा मारताना दिसले. त्यांनी प्रवाशांशी हस्तांदोलन करून त्यांची विचारपूस केली. या अनपेक्षित भेटीमुळे नेहमीचा मेट्रो प्रवास प्रवाशांसाठी विशेष ठरला. मोदींच्या हातात मेट्रो कार्ड असल्याचेही दिसून आले. श्री राम कॉलेज ऑफ कॉमर्सची स्थापना १९२६ मध्ये झाली असून, यंदा संस्थेने १०० वर्षे पूर्ण केली आहेत. वाणिज्य आणि अर्थशास्त्राच्या क्षेत्रातील देशातील प्रतिष्ठित संस्थांमध्ये एसआरसीसीचा समावेश होतो. शताब्दी सोहळ्यात पंतप्रधान मोदींनी एसआरसीसीच्या योगदानाचे कौतुक केले. या संस्थेने व्यवसाय, सार्वजनिक जीवन आणि समाजातील विविध क्षेत्रांसाठी अनेक पिढ्यांतील नेतृत्व घडवले असल्याचे त्यांनी नमूद केले. सोहळ्यादरम्यान एसआरसीसीच्या शताब्दीनिमित्त १०० रुपयांचे स्मरणार्थ नाणेही जारी करण्यात आले. विशेष म्हणजे, मोदी यांचा एसआरसीसीशी जुना संबंध आहे. २०१३ मध्ये गुजरातचे मुख्यमंत्री असताना त्यांनी या महाविद्यालयाला भेट दिली होती. आता १३ वर्षांनंतर पंतप्रधान म्हणून ते पुन्हा एसआरसीसीमध्ये पोहोचले. मेट्रो प्रवास आणि डठउउच्या शताब्दी सोहळ्यातील सहभागामुळे पंतप्रधान मोदींच्या या दिल्ली दौऱ्याची चांगलीच चर्चा होत आहे.

पान १ वरून

### पावसाअभावी सोयाबीन पिकांचे

तातडीने कार्यवाही करून नुकसानीची नोंद करावी, अशी मागणी त्यांनी केली. पीक विम्याचा लाभ मिळावा पिकांचे ८० ते ९० टक्क्यांपर्यंत नुकसान झाल्याने संबंधित शेतकऱ्यांना पीक विम्याचा लाभ मिळणे आवश्यक असल्याचे लोणीकर यांनी सांगितले. पूर्वी मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्यानंतरच विम्याचा लाभ मिळत असे; मात्र आता ३३ टक्क्यांपेक्षा अधिक नुकसान झाल्यास पीक विम्याचा लाभ मिळण्याची तरतूद असल्याचे त्यांनी नमूद केले. त्यामुळे पात्र शेतकऱ्यांना विम्याची रक्कम मिळवून देण्यासाठी पाठपुरावा करण्याचे त्यांनी आश्वासन दिले.

**मुख्यमंत्र्यांसह संबंधित मंत्र्यांची भेट घेणार**

शेतकऱ्यांच्या या गंभीर परिस्थितीचा अहवाल घेऊन आपण स्वतः मुंबई येथे मुख्यमंत्री, महसूल मंत्री व कृषी मंत्री यांची भेट घेणार असल्याचे आमदार लोणीकर यांनी सांगितले. शेतकऱ्यांना नुकसानभरपाई, अनुदान तसेच पीक विम्याचा लाभ मिळावा यासाठी शासनाकडे प्रभावीपणे पाठपुरावा केला जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले. शेतकऱ्यांना मदत मिळवून देण्यासाठी वेळ पडल्यास मराठवाड्यातील सर्व आमदारांना सोबत घेऊन विधानसभेत आवाज उठवू. शेतकऱ्यांना न्याय मिळेपर्यंत हा लढा सुरूच राहील, असा निर्धार बबनराव लोणीकर यांनी व्यक्त केला. या पाहणी दौऱ्यावेळी नायब तहसीलदार, तालुका कृषी अधिकारी, तलाठी, ग्रामसेवक, सरपंच तसेच स्थानिक पदाधिकारी व संबंधित अधिकारी उपस्थित होते.

### तुमसे ना हो पयेगा';

मराठवाड्याचा अनुशेष भरून काढण्यासाठी ४७ हजार कोटी रुपयांच्या विकासकामांची घोषणा करण्यात आली होती. मात्र, दहा वर्षांचा कालावधी उलटूनही अपेक्षित विकास झालेला नाही. जालना जिल्ह्यातील विविध विकासकामेही अद्याप प्रलंबित असून, रस्ते, पाणीपुरवठा, आरोग्य सुविधा, ड्रायपोर्ट येथे पायाभूत सुविधांचा अनुशेष, अंबड येथील मत्स्योदरी मंदिर साठी ४० कोटी, अंबड येथील पाणीपुरवठ्यासाठी ३५ कोटी तसेच जालना येथील १५ एमएलडी जलशुद्धीकरणासाठी ५६ कोटी, जाफराबाद येथील पाणीपुरवठा साठी ४८ कोटी निम्न दुधना प्रकल्पासाठी ७ कोटी ८५ लाख, आयटीआय साठी १० कोटी, स्वातंत्र्यसैनिक स्वर्गीय दगडाबाई शेळके यांच्या स्मारकासाठी ५ कोटी

पान १ वरून

रुपये अशा विविध विकास कामांसाठी घोषणांचा पाऊस पाडला होता परंतु यातील एकाही काम पूर्णत्वाकडे नेले नाही असा आरोप देखील त्यांनी या पत्रकार परिषदेत केला. जालना जिल्ह्यातील विकासकामांचा अनुशेष पूर्ण करण्यासाठी शासनाने ठोस निधी उपलब्ध करून देऊन कामे मार्गी लावावीत. केवळ घोषणांवर विकासाचा गवगवा न करता प्रत्यक्षात किती कामे झाली, किती निधी खर्च झाला आणि किती कामे अद्याप प्रलंबित आहेत, याचा हिशेब सरकारने जनतेसमोर मांडावा, अशी मागणी श्रीवास्तव यांनी केली. यंदा मागील दीड महिन्यापासून पावसाने दडी मारल्याने शेतकरी संकटात सापडला आहे.आसमानी-सुलतानी संकटामुळे शेतकरी हवालदिल झाला असून सोयाबीन, मका आणि ऊस या पिकांवरही परिणाम होण्याची शक्यता आहे. त्यामुळे सरकारने शेतकर्यांसाठी तातडीने आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणीही करण्यात आली. मराठवाड्याचा अनुशेष भरून काढण्या सोबतच जालना जिल्ह्याच्या विकासाला गती देण्यासाठी सरकारचे लक्ष वेधणे हा आंदोलनाचा प्रमुख उद्देश असल्याचे श्रीवास्तव यांनी स्पष्ट केले. या आंदोलनात जास्तीत जास्त शिवसैनिकांनी सहभागी व्हावे तसेच सरकारच्या विरोधातील समविचारी पक्ष व संघटनांनीही आंदोलनात सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हाप्रमुख मनीष श्रीवास्तव,महेश नळगे,जिल्हा संघटक भानुदास घुगे,उपजिल्हाप्रमुख मुरलीधर शेजुळ,भगवान कदम,हनुमान धांडे, माधवराव कदम,रमेश गव्हाड, परमेश्वर जगताप, अशोक आघाव,महिला आघाडी जिल्हा संघटक रूपम घुगे, शहरप्रमुख दीपक रणनवरे,महेश पुरोहित, तालुकाप्रमुख कैलास पुंगले,कुंडलिक मुट्टे, दिनेश काकडे,गणेश दराडे, जयप्रकाश चव्हाण, रामेश्वर फंड,सुभाष राऊत,यांच्यासह युवासेना जिल्हाधिकारी गणेश काळे यांनी केले आहे.

### जालन्यात आज सकल

अतिथी व सत्कारमूर्ती म्हणून उपस्थित राहणार आहेत. या सोहळ्यात जालना महानगरपालिकेचे महापौर वंदनाताई मगरे, उपमहापौर राजेश राऊत, सभापती संध्याताई देठे, सुनील बापू आर्दड, मा. उपनगराध्यक्ष भास्कर आबा दानवे शहर जिल्हाध्यक्ष भारतीय जनता पार्टी प्रा. सोपानराव तेलगढ मा. जिल्हाध्यक्ष मराठा सेवा संघ जालना विष्णूभाऊ पाचपुले, शिवसेनेचे शहर जिल्हाध्यक्ष तथा नगरसेवक,

पान १ वरून

मराठा महासंघाचे जिल्हाध्यक्ष अरविंद देशमुख, मल्हार योद्धा दीपकभाऊ बोऱ्हाडे, पंचायत समिती जालना सभापती मुरली आबा थिटे, किशोर पाटील शिरावत, संस्थाळारसश.पिस ळारसश.पिस ळारसश.पिस ळारसश. पिस पक अध्यक्ष छावा महाराष्ट्र सेना, जिल्हाध्यक्ष ज्योतीराम माने, अंकुश भाऊ चव्हाण खोतकर समर्थक संस्थापक कोषाध्यक्ष संभाजी ब्रिगेड संतोष गाजरे, प्राचार्य डॉ. प्रसाद मदन, प्रसिद्ध विधिज्ञ ॲड. अरविंद मुरमे, सभापती सुजित जोगस, नगरसेविका सुलोचना गोर्डे, माजी जिल्हा परिषद सदस्य कल्पनाताई शिंदे, महानगरपालिका गटनेते महेश निकम, मा. जिल्हा परिषद सदस्य कृष्णा जाधव, मराठा महासंघाचे कोषाध्यक्ष अशोकराव पडुळ, संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष कैलाश खांडेभराड, पंचायत समिती बदनापूर सभापती संजय जगदाळे, शिवसेना तालुकाध्यक्ष ज्ञानेश्वर सोनवणे, सामाजिक कार्यकर्ते रामप्रसाद बोराडे, पंचायत समिती सदस्य अरुण डोळसे, जिल्हा परिषद सदस्य गणेशराव डोळस, सामाजिक कार्यकर्ते डॉ. संजय लोढे, मराठा क्रांती मोर्चाचे समन्वयक प्रशांत वाडेकोर, शंकरराव बेंद्रे, बाबुराव शिंदे, नगरपंचायत बदनापूरचे गटनेते बाबासाहेब कराळे आणि सुमन ताई शेळके उद्योजक अंबड,संभाजी ब्रिगेडच्या विभावरी ताकट यांचा गौरव करण्यात येणार आहे. समाजातील प्रश्नांना वाचा फोडण्यासह पत्रकारितेच्या माध्यमातून जनहिताचे प्रश्न मांडणाऱ्या पत्रकार व संपादकांचाही यावेळी गुणगौरव करण्यात येणार आहे. पत्रकार परिषद जालनाचे अध्यक्ष अंकुश आप्पा देशमुख, प्रेस क्लब जालनाचे अध्यक्ष मकरंद जागिरदार, व्हॉइस ऑफ मीडियाचे अध्यक्ष राजेश भालेराव, प्रेस कौन्सिलचे अध्यक्ष दीपक शेळके, ज्येष्ठ पत्रकार शेख महेमुद, संपादक भरत मानकर, संपादक संतोष भुतेकर, संपादक अविनाश कव्हळे, संपादक मनोज कोलते पाटील, संपादक अर्पण गोयल, आमिर खान, अंकुश गायकवाड, अलमखान पठाण, उपसंपादक संजय शेलकर, पत्रकार संजय उनगे, पत्रकार सुनील डोळसे, रवि शिंदे आणि संपादक विकास बागडी यांचा विशेष सन्मान करण्यात येणार आहे. सकल मराठा समाजातील विविध प्रश्न, शेतकरी आणि नागरिकांच्या समस्या, सामाजिक व शैक्षणिक प्रश्न तसेच समाजाच्या भविष्यातील वाटचालीबाबत या संवाद मेळाव्यात विचारविनिमय

पान १ वरून

होणार आहे. विविध क्षेत्रांत कार्यरत असलेल्या मान्यवरांची उपस्थिती आणि समाजातील नागरिकांशी थेट संवाद हे या कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण ठरणार आहे. कार्यक्रमास सकल मराठा समाजातील नागरिकांनी सहकुटुंब, सहपरिवार व मित्रपरिवारासह मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. कार्यक्रमाचे आयोजन छत्रपती व्ही. के. फाउंडेशनचे अध्यक्ष तथा प्रेस क्लब जालना सचिव विष्णू कदम आणि छावा महाराष्ट्र सेनेचे युवक अध्यक्ष निखिल वीर यांच्या पुढाकारातून करण्यात आले आहे. सोपन एखंडे, बाबासाहेब बुटरे, राम उजेड, उद्धवराव गुळमकर आणि भागवत काळे यांच्यासह अमोल जाधव हे संयोजनाची जबाबदारी पाहत आहेत. श्रावण भुजोड, नामदेव काळे, शंकर जाधव, राजाभाऊ गुलगे, बळीराम घाटे, लक्ष्मण काटे, डॉ. सुभाष बीटले, गणपत जाधव, प्रकाश मस्के, अशोक काळे, रामजी कोरडे आणि प्रभाकर शिंदे यांच्यासह कार्यकर्ते कार्यक्रमाच्या आयोजनासाठी परिश्रम घेत आहेत.

### श्री गणेश विसर्जन

रस्त्यांवरील खड्डे, नाल्यांवरील झाकणे (ढापे) आदी बाबींची प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली. संबंधित विभागांना आवश्यक त्या दुरुस्त्या व उपाययोजना तातडीने करण्याच्या सूचना देण्यात आल्या. यावेळी उपमहापौर राजेश राऊत, मा. आयुक्त अंजली शर्मा(भाप्रसे), सदरबाजार पोलीस स्टेशनचे पोलीस अधिकारी भारती, तसेच महानगरपालिकेचे बांधकाम अभियंता, लाईट विभागाचे अभियंता, स्वच्छता प्रमुख, गार्डन विभागाचे प्रमुख, एमएसईबी विभागाचे अभियंता आणि संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते. श्री गणेश विसर्जनाच्या मिरवणुकीला कोणत्याही प्रकारचा अडथळा किंवा विघ्न निर्माण होऊ नये, यासाठी जालना शहर महानगरपालिकेच्या वतीने आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्यात येणार आहेत. श्री गणेश विसर्जन शांततेत, सुरक्षित आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडावे, यासाठी महानगरपालिका प्रशासन तयारी करीत आहे.

### जालना मानपात तब्बल

महानगरपालिका त्यांच्या पाठीशी ठामपणे उभी राहील, अशी ग्वाही त्यांनी दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शिक्षण उपायुक्त सुप्रिया चव्हाण यांनी केले. यावेळी महानगरपालिकेतील शिक्षक-शिक्षिका, मुख्याध्यापक आणि संबंधित अधिकारी उपस्थित होते.

पान ४ वरून

### जालना महापालिका स्थायी

करण्याबाबतही संबंधित विभागाला सूचना देण्यात आल्या. सभागृह सन्माननीय सदस्य भास्कर आबा दानवे सन्माननीय सदस्य अक्षय गोरंट्याल सन्माननीय सदस्य महावीर ढक्का सन्माननीय सदस्य अशोक पवार सन्माननीय सदस्य महेश निकम इत्यादींनी कामकाजात भाग घेऊन सविस्तर विषयाची मांडणी केली. बैठकीस महापालिकेचे संबंधित अधिकारी, विभागप्रमुख, कर्मचारी तसेच स्थायी समितीचे सन्माननीय सदस्य उपस्थित होते. अखेर उपस्थित सर्व सन्माननीय सदस्यांचे आभार मानून सभापती अशोक उर्फ लक्ष्मीकांत मनोहरराव पांगारकर यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

### प्राध्यापक व शिक्षकेतर

संस्कार, शिस्त, प्रामाणिकपणा व माणुसकीची मूल्ये आत्मसात करण्याचे आवाहन केले. शिक्षकांकडून मिळणारे ज्ञान आणि मार्गदर्शन विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनात आचरणात आणावे. मेहनत, सातत्य आणि आत्मविश्वासाच्या बळावर विद्यार्थ्यांनी आपले ध्येय साध्य करावे, असे त्यांनी सांगितले. संस्थेचे सचिव उकाजी जाधव यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना शिक्षक हे समाजाच्या भावी पिढीचे शिल्पकार असल्याचे सांगितले. विद्यार्थ्यांनी शिक्षकांचा आदर करून त्यांच्या मार्गदर्शनाचा लाभ घ्यावा. शिक्षणाच्या माध्यमातून स्वतःचा तसेच समाजाचा विकास साधण्याचा प्रयत्न करावा, असे आवाहन त्यांनी केले. उपाध्यक्ष ड. सुरेंद्र जाधव यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. आजच्या स्पर्धात्मक युगात विद्यार्थ्यांनी गुणवत्तापूर्ण शिक्षणासोबत व्यक्तिमत्त्व विकासावर भर द्यावा. वेळेचे योग्य नियोजन, नियमित अभ्यास व कठोर परिश्रम यांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनात यश मिळवावे, असे त्यांनी नमूद केले. प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा सत्कार शिक्षक दिनाच्या औचित्याने महाविद्यालयातील सर्व विषयांचे प्राध्यापक, प्राध्यापिका तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे विद्यार्थ्यांच्या व संस्थेच्या वतीने पुष्पगुच्छ देऊन स्वागत व सत्कार करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांनी आपल्या शिक्षकांना शिक्षक दिनाच्या शुभेच्छा देत त्यांच्या कार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. रामकिसन चाटसे यांच्यासह सर्व विषयांचे प्राध्यापक, प्राध्यापिका, शिक्षकेतर कर्मचारी तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. शिक्षक व विद्यार्थ्यांमध्ये असलेला स्नेह आणि

पान ४ वरून

आपुलकी या प्रसंगी प्रकर्षाने दिसून आली. गोपाळकाल्याने कार्यक्रमात रंगत शिक्षक दिनाच्या कार्यक्रमानंतर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या सहभागातून गोपाळकाला व दहीहंडी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेत दहीहंडी फोडली. यावेळी विद्यार्थ्यांनी जल्लोष करत आनंद व्यक्त केला.

गोपाळकाला हा एकता, सहकार्य, संघभावना आणि परस्पर विश्वासाचा संदेश देणारा भारतीय सांस्कृतिक उत्सव असल्याचे यावेळी सांगण्यात आले. विद्यार्थ्यांनी एकजुटीने सहभाग घेतल्यामुळे कार्यक्रमाला विशेष रंगत आली. महाविद्यालय परिसरात उत्साहाचे व आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते. शिक्षक दिनानिमित्त प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा करण्यात आलेला सन्मान आणि गोपाळकाला कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांना गुरु-शिष्य नात्याचे महत्त्व तसेच भारतीय संस्कृती व परंपरेची ओळख झाली. संपूर्ण कार्यक्रम उत्साहात, शिस्तबद्ध आणि आनंदी वातावरणात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्राचार्य प्रा. रामकिसन चाटसे, सर्व विषयांचे प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले. मोठ्या संख्येने उपस्थित विद्यार्थ्यांनी कार्यक्रमाचा आनंद घेतला. उपस्थित मान्यवरांनी कार्यक्रमाचे कौतुक करून सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

### रोटरी क्लब जालना

भावी पिढीचे चारित्र्य आणि समाजाची दिशा घडवणारे शिल्पकार असतात. त्यांच्या अविरत परिश्रमामुळेच सुजाण व सक्षम नागरिक घडतात. अशा गुरुजनांप्रती कृतज्ञता व्यक्त करणे हे आपल्या सर्वांचे आद्यकर्तव्य असून, शिक्षकांचा सन्मान करताना क्लबला सार्थ अभिमान वाटत आहे. या कार्यक्रमाला क्लबचे सदस्य निर्मला साबू, डॉ. सुरेश साबू, प्रीतम मिश्रीकोटकर, जयेश पहाडे, कैलास तोष्णीवाल, नितीन खंडेलवाल, डॉ. प्रतिभा श्रीपत, पंकज लड्डा, गौरव करवा, सुमित्रा गादिया, आलोक गाडोदिया, आशिष राठी, सुयोग साहुजी, प्रा. भगवानसिंग ढोबाळ, आरती भक्कड, नेहा पाटणी आदींची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महेश माळी यांनी केले तर आभार प्रदर्शन सचिव डॉ. अतुल जिंतूरकर यांनी केले.


बदनापूर : नवनाथ गव्हाणे

# चिमुकल्यांच्या जल्लोषात गुरुकुलम् शिशुवाटिकेत दहीहंडी उत्सव

गुरुकुलम् शिशुवाटिका, बदनापूर येथे आज दहीहंडी उत्सव मोठ्या उत्साहात व आनंदी वातावरणात संपन्न झाला. यावेळी चिमुकल्या विद्यार्थ्यांनी श्रीकृष्ण, राधा व गवळणी यांची पारंपरिक वेशभूषा परिधान करून उत्सवात सहभाग घेतला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला विद्यार्थ्यांना श्रीकृष्ण पाळणा, श्रीकृष्ण जन्माष्टमी आणि दहीहंडी उत्सवाचे महत्त्व सांगण्यात आले. त्यानंतर चिमुकल्या विद्यार्थ्यांनी 'हाती घोडा, पालखी', 'जय कन्हैया लाल की' अशा जयघोषांनी परिसर दुमदुमून सोडला. उत्साहपूर्ण वातावरणात विद्यार्थ्यांनी दहीहंडी फोडून उत्सवाचा आनंद लुटला. या कार्यक्रमास डॉ. अनुराधा पाटील, शाळेचे व्यवस्थापक नवनाथ गव्हाणे, मुख्याध्यापिका अश्विनी डिघे, शिक्षिका स्वाती पवार, अपर्णा काळे व निशा वाकडे यांची उपस्थिती होती. पारंपरिक संस्कृती व सणांचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावे, या उद्देशाने शाळेत विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येते.


विजय कनुजे यांची मुख्य कार्यकारी अधिकारी पदी नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करतानां शर टोपे,महाराष्ट्र गवळी समाज संघटने चे प्रदेश सचिव नंदकिशोर जांगडे, स्वामी विवेक बॅाक चे अध्यक्ष अभय कुलकर्णी, सभापती विजय काबंळे, लखन जांगडे, शहर कार्य अध्यक्ष ज्ञानेश्वर धानोरे, नितीन मेघावाले आदी.

# प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार; विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग

सेवली/प्रतिनिधी : तालुक्यातील जिजाई प्रतिष्ठान संचलित लोकमान्य टिळक महाविद्यालयात शिक्षक दिन व गोपाळकाला उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. शिक्षक दिनाचे औचित्य साधून महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे विद्यार्थी व संस्थेच्या वतीने पुष्पगुच्छ देऊन स्वागत व सत्कार करण्यात आला. या उपक्रमातून विद्यार्थ्यांनी आपल्या शिक्षकांप्रती कृतज्ञता व आदर व्यक्त केला.



कार्यक्रमास जिजाई प्रतिष्ठानच्या अध्यक्षा जिजाबाई जाधव, संस्थेचे सचिव उकाजी जाधव व उपाध्यक्ष ड. सुरेंद्र जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या प्रारंभी जिजाबाई जाधव यांच्या हस्ते भारतरत्न डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या शैक्षणिक कार्याचे स्मरण करून शिक्षक दिनाचे महत्त्व विशद केले. शिक्षक हे विद्यार्थ्यांच्या जीवनाला योग्य दिशा देणारे मार्गदर्शक असून, विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासात शिक्षकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचे मान्यवरांनी सांगितले.

जिजाई प्रतिष्ठानच्या अध्यक्षा जिजाबाई जाधव यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना शिक्षणासोबतच **(पान ३ वर)**

# जालना मनपा स्थायी समितीची सभापती सभा अशोक उर्फ लक्ष्मीकांत पांगारकर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न

जालना/प्रतिनिधी : जालना महापालिकेची स्थायी समितीची बैठक भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी सभागृहात दिनांक ३ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता स्थायी समिती सभापती अशोक उर्फ लक्ष्मीकांत मनोहरराव पांगारकर यांच्या अध्यक्षतेखाली मोठ्या उत्साहात संपन्न झाली. या बैठकीत एकूण सहा विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. यामध्ये कर मूल्यनिर्धारणाबाबत नियुक्त करण्यात आलेल्या एजन्सीच्या प्रगती अहवालाचा आढावा घेण्यात आला. यावेळी कर अधिकारी यांनी शहरातील सुमारे ६ हजार घरांचे सर्वेक्षण पूर्ण झाल्याची माहिती दिली. तसेच शहरातील विविध भागांमध्ये सहा टीमद्वारे सर्वेक्षणाचे काम सुरू असल्याचे सांगितले. महापालिकेच्या उत्पन्नात वाढ करण्याच्या दृष्टीने कर मूल्यनिर्धारणाचे काम प्रभावीपणे पूर्ण करून महापालिकेला सुमारे १०० कोटी रुपयांपर्यंत उत्पन्न मिळवून देण्याचे उद्दिष्ट ठेवून काम करण्याच्या सूचना स्थायी समिती सभापती अशोक उर्फ लक्ष्मीकांत मनोहरराव पांगारकर यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. महापालिकेच्या आर्थिक बाबींवर नियंत्रण ठेवण्याच्या सूचना महापालिकेच्या आर्थिक बाबींवर प्रभावी



नियंत्रण ठेवण्याच्या दृष्टीने सर्व विभागप्रमुखांनी त्यांच्या विभागास प्राप्त होणारा निधी तसेच त्या निधीतून प्रस्तावित करण्यात येणाऱ्या कामांची स्थायी समितीला पूर्वकल्पना देण्याच्या सूचना सभापतींनी दिल्या. तसेच मागील नगरपालिका काळात झालेल्या B.O.T. (Build-Operate-Transfer) प्रस्तावांची सद्यस्थिती काय आहे,

**प्रगती अहवाल न देणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाईचा इशारा**

**स्थायी समितीच्या बैठकीत झालेल्या चर्चेनुसार संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी आपापल्या विभागातील कामांचा प्रगती अहवाल लेखी स्वरूपात सन्माननीय सदस्यांना वेळेत सादर करणे आवश्यक आहे. प्रगती अहवाल सादर न करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येईल, अशी स्पष्ट ताकीद स्थायी समिती सभापती अशोक उर्फ लक्ष्मीकांत मनोहरराव पांगारकर यांनी दिली.**

याबाबतचा सविस्तर अहवाल स्थायी समितीसमोर सादर करण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आल्या.

**स्वच्छता निविदा प्रक्रिया तीन दिवसांत पूर्ण करण्याचे निर्देश**

शहरातील स्वच्छता व्यवस्था अधिक प्रभावी करण्यासाठी प्रस्तावित असलेली निविदा प्रक्रिया तात्काळ पूर्ण करून येत्या तीन दिवसांत ती प्रक्रिया पूर्ण करण्याबाबत संबंधित उपायुक्तांना स्पष्ट सूचना देण्यात आल्या. सणासुदीच्या काळात धूर फवारणी करण्याच्या सूचना गणेशोत्सव, नवरात्रोत्सव आणि दिवाळीच्या कालावधीत शहरातील स्वच्छता व आरोग्याच्या दृष्टीने आवश्यक त्या ठिकाणी नियमित धूर फवारणी (फॉगिंग) **(पान ३ वर)**

# श्री गणेश महासंघाच्या अध्यक्षपदी श्लोक अग्रवाल

## कार्याध्यक्षपदी ॲड. महेश धन्नावत तर महासचिवपदी भूषण यादव



जालना/प्रतिनिधी– श्री गणेश महासंघाच्या अध्यक्षपदी श्लोक जगदीश अग्रवाल, कार्याध्यक्षपदी ॲड. महेश धन्नावत तर महासचिवपदी भूषण पारसनंद यादव यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.

शुक्रवार दि. ४ सप्टेंबर रोजी मामा चौकातील हॉटेल विजय विलास येथे श्री गणेश महासंघाची बैठक झाली. या अध्यक्षस्थानी मावळते अध्यक्ष रोहीत भूरेवाल हे होते. याप्रसंगी श्री गणेश महासंघाच्या अध्यक्षपदी सर्वानुमते श्लोक जगदीश अग्रवाल यांची निवड करण्यात आली. यावेळी रोहित भुरेवाल यांनी पुष्पहाराने स्वागत करून श्लोक जगदीश अग्रवाल यांना शुभेच्छा दिल्या. त्यानंतर सर्वसंमतीने कार्याध्यक्षपदी ड. महेश धन्नावत तर महासचिवपदी भूषण पारसनंद यादव यांची निवड करण्यात आली.

यावेळी युवा उद्योजक अर्जुन पित्ती, आनंद बंब, सामाजिक कार्यकर्ते तथा जालना शहर महानगरपालिकेचे विरोधी पक्ष नेता कमलेश खरे, शिवसेना नगरसेवक दुर्गेश कटोटीवाले, माजी महासचिव मनीष नंद, माजी नगरसेवक रोशन चौधरी, नारायण भगत, सुनील भुरेवाल, कुंदन गोमतीवाले, सोनू नंद, राजेश कांबले, नीतीश टेकूर, नगरसेवक शिवराज नारियलवाले, अनुराग अग्रवाल, ड. शिशिरुत विजसेनानी, अक्षय भुरेवाले, हर्ष भगत, राहुल चौधरी, करण भगत, अक्षय महाजन, शंकर भूरेवाल, महेश वाघमारे, पित्ती, अजय यादव, सौरभ यादव, विवेक यादव, श्री. भुमरे आदींची उपस्थिती होती.

विविध सांस्कृतिक आणि सामाजिक उपक्रमांनी गणेशोत्सव साजरा करण्यात येणार असल्याचे नूतन अध्यक्ष श्लोक अग्रवाल म्हणाले. उर्वरित कार्यकर्णी लवकरच जाहीर करण्यात येणार असल्याचे महासचिव भुषण यादव यांनी सांगितले. सुत्रसंचलन आणि आभार प्रदर्शन सोमेश काबलीये यांनी केले.


जालना शहरातील आनंदी स्वामी गल्ली येथे आज दहीहंडी उत्सव मोठ्या उत्साहात व आनंदी वातावरणात संपन्न झाला. छाया : किरण खानापुरे


आज रोजी जुना जालना येथे गोकुळ अष्टमीनिमित्त मकाजी महाराज यांची पालखी सोहळा आज रोजी काढण्यात आला ही पालखी साळी गल्ली येथून शनी मंदिर कचेरी रोड गणपती गल्ली शास्त्री मोहल्ला बाजारचौकी आनंदी स्वामी गल्ली व पुन्हा मका जी महाराज मंदिराकडे विसर्जन झाले.
छायाचित्र : किरण खानापुरे

# जालना महानगरपालिकेचे उपायुक्त त्र्यंबक कांबळे यांना भावपूर्ण निरोप

## परळी वैजनाथ नगरपरिषदेच्या मुख्याधिकारीपदी झाली आहे बदली; महापालिकेत निरोप समारंभ संपन्न

जालना: जालना शहर महानगरपालिकेचे उपायुक्त श्री. त्र्यंबक कांबळे यांची परळी वैजनाथ (जि. बीड) येथे नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी या पदावर पदोन्नती/बदली झाली आहे. त्या अनुषंगाने जालना महानगरपालिकेच्या वतीने त्यांना भावपूर्ण निरोप देण्यासाठी विशेष समारंभाचे आयोजन करण्यात आले होते.

महानगरपालिकेच्या भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृहात मनपा आयुक्त श्रीमती अंजली शर्मा यांच्या अध्यक्षतेखाली हा निरोप समारंभ संपन्न झाला. याप्रसंगी मंचावर उपायुक्त श्रीमती नंदा



गायकवाड, सहाय्यक आयुक्त सौ. सुप्रिया चव्हाण, सहाय्यक आयुक्त श्री. विजय फुलंब्रीकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी मनपा आयुक्त श्रीमती अंजली शर्मा यांनी मनोगत व्यक्त करताना, उपायुक्त श्री. त्र्यंबक कांबळे यांच्या जालना महापालिकेतील कार्यकाळाचा गौरव केला. त्यांनी प्रशासकीय कामकाज अत्यंत चोख व कार्यक्षमतेने सांभाळून महापालिकेच्या विविध विकासकामांना गती दिली, असे नमूद करत त्यांच्या पुढील वाटचालीस व नव्या पदासाठी शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमादरम्यान उपस्थित अन्य अधिकारी व कर्मचाऱ्यांनीही श्री. कांबळे यांच्यासोबतच्या कामाचे अनुभव सांगत, त्यांच्या शांत, संयमी स्वभाव आणि कामाप्रती असलेल्या निष्ठावान वृत्तीचे कौतुक केले. सत्काराला उत्तर देताना श्री. कांबळे यांनी जालना महानगरपालिकेत काम करताना आयुक्त, सर्व सहकारी अधिकारी व कर्मचाऱ्यांचे मिळालेले सहकार्य मोलाचे ठरल्याचे सांगून सर्वांचे आभार मानले. या कार्यक्रमास महानगरपालिकेचे सर्व विभागप्रमुख, अधिकारी व कर्मचारी वर्ग उपस्थित होता.

# रोटरी क्लब जालना रेनबोतर्फे शिक्षक दिनानिमित्त सहा शिक्षकांचा गौरव

## डॉ. शिवरतन मानधना यांना 'द्रोणाचार्य पुरस्कार' प्रदान



जालना/प्रतिनिधी : रोटरी क्लब ऑफ जालना रेनबोतर्फे शिक्षक दिनानिमित्त सहा शिक्षकांचा शाल, श्रीफळ व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला तसेच शिक्षण क्षेत्रातील उत्कृष्ट कार्याबद्दल डॉ. शिवरतन मानधना यांना यंदाचा मानाचा 'द्रोणाचार्य पुरस्कार' प्रदान करण्यात आला तर क्लबमधील शिक्षक सदस्यांचाही यावेळी यथोचित गौरव करण्यात आला.

हॉटेल सेफ्रानच्या सभागृहात पार पडलेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी क्लबच्या अध्यक्षा मधुलता भक्कड ह्या होत्या. यावेळी व्यासपीठावर सचिव डॉ. अतुल जिंतूरकर आणि कोषाध्यक्ष केतन शाह उपस्थित होते.

याप्रसंगी मान्यवरांच्याहस्ते डॉ. शिवरतन मानधना यांना द्रोणाचार्य पुरस्काराने सन्मानित करण्यात आले तर राहुल जयरंगे, वर्षा जयरंगे, विठ्ठल पडूळे,प्रदीप मेहत्रे, शिवाजी देव्हडे, श्री. कोकणे या शिक्षकांचा शिक्षक दिनानिमित्त गौरव करण्यात आला.

अध्यक्षीय भाषणात मधुलता भक्कड म्हणाल्या की, शिक्षक हे केवळ पुस्तकी ज्ञान देणारे नसून **(पान ३ वर)**